| MHJN100000092015 | दाखल दिनांक : ०८/०१/२०१५<br>नोंदणी दिनांक : ०८/०१/२०१५<br>निकाल दिनांक : **०२/०५/२०२६**<br>कालावधी : **११ वर्ष, ०३ म., २५दि.** |
|---|---|

**भाग – अ**

**मंठा येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.०१ ) यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी – **श्रीमती एल. पी. धन्वे,** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी)

**नि.क्र. ६६**

नि. फौ. ख. क्र. ३/२०१५

(गुन्हा क्र. ३००६/२०१४ **सेवली** पोलिस स्टेशन)

**फिर्यादी –** **महाराष्ट्र सरकार तर्फे**
पोलीस ठाणे अधिकारी **सेवली,**
ता. जि. जालना.

**सरकारतर्फे विधिज्ञ –** श्री. एल.आर. पांचाळ, सहा. सरकारी अभियोक्ता.

**– विरुध्द –**

**आरोपी –** १) **निवास धरमचंद चव्हाण,**
वय सज्ञान,
रा. पाहेगांव, ता.जि. जालना

२) **रविंद्र रामचंद्र मोरे,**
वय सज्ञान,
रा. म.रा.वि.वि.कं. सेवली,
ह.मु. म.रा.वि.वि.कं. छावणी, औरंगाबाद

**आरोपींतर्फे विधीज्ञ** – श्री. व्ही.आर. वायाळ

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १०/१०/२०१४ |
| फिर्याद दाखल दिनांक | १०/१०/२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ३१/१२/२०१४ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०२/०१/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २०/१२/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | **०२/०५/२०२६** |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | दोषी/ निर्दोष | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ च्या उद्देशाकरीता आरोपी खटल्या दरम्यान तुरुंगामध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **निवास धरमचंद चव्हाण** | सी.आर.पी.सी. चे कलम ४१ प्रमाणे नोटीस | दिनांक ०८.०१. २०१५ | भारतीय दंड संहितेचे कलम १८८ सह कलम ३ प्रॉपर्टी डॅमेज ऐक्ट अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| **२.** | **रविंद्र** | सी.आर.पी.सी. चे | दिनांक ०८.०१. | भारतीय दंड संहितेचे कलम १८८ सह कलम | **निर्दोष** | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **रामचंद्र मोरे** | कलम ४१ प्रमाणे नोटीस | २०१५ | ३ प्रॉपर्टी डॅमेज ऍक्ट अन्वये | **मुक्तता** | | |

## भाग – क

सरकार/बचावपक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी –

अ. सरकारतर्फे साक्षीदार

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | केशव शंकर पगारे | फिर्यादी |
| २. | रंगराव उर्फ रंगनाथ काशीनाथ जाधव | घटनास्थळ पंच |

ब. बचावपक्ष साक्षीदार – निरंक.

क. न्यायालयातर्फे साक्षीदार – निरंक.

सरकारतर्फे/बचावपक्षतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांकाची यादी.

अ. सरकारतर्फे –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ४५ | फिर्याद |
| २. | नि.क्र. ४६ | प्रथम खबर अहवाल |
| ३. | नि.क्र. ४७ | पुरवणी जबाब |
| ४. | नि.क्र. ५८ | घटनास्थळ पंचनामा |

ब. बचावपक्षतर्फे – निरंक.

क. न्यायालयातर्फे – निरंक.

ड. भौतीक – वस्तु

| अ.क्र | भौतीक–वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## <u>न्या य नि र्ण य</u>

( दिनांक ०२/०५/२०२६ रोजी पारीत )

आरोपींविरुध्द सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३ अन्वये खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की</u> :–**

**२.** केशव शंकर पगारे (यापुढे '**फिर्यादी**' असे संबोधण्यात येते.) यांनी अशी तक्रार दाखल केली की, ते ९९-परतूर विधानसभा मतदारसंघामध्ये फिरते पथक क्र. ०३ब चे पथक म्हणून काम करीत होते. दि. १०/१०/२०१४ रोजी ते पथकातील रामेश्वर मोहीते, तलाठी, पो.ना. चव्हाण व कॅमेरामॅन संतोष खरात यांच्यासोबत कैलास नगर तांडा/पळसखेड येथे हजर असतांना व आचार संहिता लागू असतांना राजकीय पक्षाच्या रॅली, सभा व आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणीची पाहणी करीत असतांना सायंकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास मौजे कैलासनगर तांडा येथे गावातील पिठाच्या गिरणीजवळ इलेक्ट्रीक पोलवर अपक्ष उमेदवार निवास धरमचंद चव्हाण यांचे बॅनर अनाधिकृतरित्या लावलेला दिसला. त्यामुळे आचारसंहितेचा भंग झाला. अशा स्वरुपाची

फिर्यादीने पोलीस स्टेशन सेवली येथे तक्रार दिली. त्यानंतर फिर्यादीने पुरवणी जवाब नोंद करुन कैलासनगर/पळसखेडा हया विभागास विद्युत पुरवठा जयपुर सब स्टेशन येथुन होतो परंतु सदर विभागाची देखरेख ही सेवली सब स्टेशनकडे असून कनिष्ट अभियंता सेवली यांच्या व अपक्ष उमेदवार निवास धरमचंद चव्हाण विरुध्द तक्रार दाखल केली

३. फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, सेवली येथे अपराध क्र. ३००६/२०१४ नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १८८ व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३ अन्वये गुन्हा नोंद केला. घटनेचा तपास पो.हे.कॉ./ब.नं.५७५/श्री.पि.एल.नागरे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी याने घटनास्थळ पंचनामा तयार केला. तसेच साक्षीदारांचे जवाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १८८ व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३९ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम १८८ मधून दोषमुक्त केले. आरोपींविरुध्द सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३ अन्वये नि.क्र. २६ वर दोषारोप निश्चीत केले. आरोपींची जबानी

नि.क्र. २७ ते २८ वर नोंदविण्यात आली. दोषारोपातील मजकुर आरोपींना मराठी भाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा **नाकबुल** करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. खटला चालवित असतांना आरोपींविरुध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आली असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१) प्रमाणे आरोपींची जबानी नि.क्र. ६१ व ६२ वर नोंदविण्यात आली. आरोपींनी त्यांच्या बचावात त्यांच्या विरुध्द खोटी केस केली असल्याचे कथन केले आहे. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**५.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. २६ वर निश्चीत केलेले दोषारोपांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १०/१०/२०१४ रोजी ०६.०० वाजेच्या सुमारास मौजे कैलासनगर/पळसखेडा, ता.जि. जालना येथे आरोपी क्र. २ यांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी क्र. १ यांनी एम.एस.ई.बी. च्या खंब्यावर निवडणुकीचे बॅनर लावले आणि अशाप्रकारे त्यांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपींना** |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | | **निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## का र ण मि मां सा

६. प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ केशव शंकर पगारे (फिर्यादी) यांची साक्ष नि.क्र. ४४ वर नोंदविली. तसेच अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ रंगराव उर्फ रंगनाथ काशीनाथ जाधव (घटनास्थळ पंच) यांची साक्ष नि.क्र. ५७ वर नोंदविली.

**मुद्दा क्र.१ करीता** :–

७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ केशव शंकर पगारे हे फिर्यादी असून त्यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान असे कथन केले आहे की, दि. १०/१०/२०१४ रोजी ते निवडणूक भरारी पथक परतूर विधानसभा मतदार संघ येथे भरारी पथक प्रमुख म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी ते गस्त करीत असतांना कैलास नगर, पळखेडा, येथे एका इलेक्ट्रीक पोलवर अपक्ष उमेदवार निवास धरमचंद चव्हाण यांच्या प्रचाराचा बॅनर लावलेला होता. त्या काळात संपूर्ण राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू होती. त्यामुळे सदरचा बॅनर सरकारी मालमत्तेवर लावणे बेकायदेशीर होते. त्यामुळे त्यांनी आचारसंहिता भंग अंतर्गत गुन्हयात तक्रार नोंद केली. त्यांनी प्रथम खबर अहलवाल व फिर्याद यावरील त्यांची सही ओळखली तसेच त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे

कथन केले. सदर साक्षीदाराने पुढे कथन केले आहे की, ज्या इलेक्ट्रीक पोलवर बॅनर लावण्यात आला होता तो जयपुर सब–स्टेशन यांच्या हद्दीत येत असल्याचा त्यांचा समज असल्याने त्यांनी त्यांच्या विरुध्द तक्रार नोंद केली होती. परंतू तपासादरम्यान सदरचा पोल हा सेवली सब–स्टेशन यांच्या हद्दीत येत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत त्यांनी पुरवणी जबाब दिला होता. त्यांनी त्यांच्या पुरवणी जवाबावरील त्यांची सही ओळखली तसेच त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले.

८. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या विधिज्ञांमार्फत उलटतपास घेण्यात आला. त्या दरम्यान या साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, इलेक्ट्रीक पोलवरील बॅनर हा नेमका कोणी लावला होता, हे त्यांना माहिती नाही तसेच तो बॅनर कोणी लावला या बाबत त्यांनी चौकशी केली नव्हती. तसेच हे देखील मान्य केले आहे की, सदर बॅनरवर आरोपी क्र. १ यांचे नाव असल्याने त्यांनी त्यांच्याविरुध्द तक्रार दाखल केली होती. न्यायालयाने विचारलेल्या निवडणूक आयोगाकडून नेमुन दिलेल्या कामाकाजामध्ये बॅनर विरुध्द कारवाई करण्याचा अथवा तक्रार देण्याचा अधिकार होता का, या प्रश्नावर या साक्षीदाराने उत्तर दिले की, त्यांना मिटींमध्ये याबाबत तोंडी सांगण्यात आले होते परंतु तसा लेखी आदेश अथवा सूची देण्यात आली नव्हती. या साक्षीदाराने पुढे हे देखील मान्य केले आहे की, त्यांनी अथवा त्यांच्या ऑफीसतर्फे कोणीही बॅनर काढला नव्हता तसेच आचारसंहिता व बॅनर लावणे याच्याशी आरोपी क्र. २ चा कोणताही संबंध नाही. या साक्षीदाराने हे देखील मान्य केले आहे की, वरीष्टांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी आरोपींविरुध्द तक्रार दाखल केली होती.

९. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ रंगराव उर्फ रंगनाथ काशीनाथ जाधव यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, पोलीसांनी त्यांना दि. ११/१०/२०१४ रोजी घटनास्थळ पंचनाम्यासाठी आकाश जाधव यांच्या चक्कीजवळ कैलासनगर येथे बोलावले होते. त्या ठिकाणी त्यांच्या सोबत देविदास नहाणू जाधव, पोलीस पाटील व पोलीस हजर होते. त्या ठिकाणी २०१४ च्या विधानसभा निवडणूकीसाठी अविनाश चव्हाण यांच्या नावाचे बोर्ड चक्कीजवळ इलेक्ट्रीक पोलवर पश्चिम बाजूस लावलेले होते. पोलीसांनी पंचनामा करण्यापुर्वी पथकाच्या लोकांनी तो बोर्ड आधीच काढून टाकला होता. पोलीसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा केला व तो त्यांना वाचून दाखलवला व त्यानंतर त्यांनी त्यावर सही केली होती. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे.

१०. आरोपीच्या विधीज्ञामार्फत या साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला, त्या दरम्यान या साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, पोलीस घटनास्थळावर आले तेव्हा तो घराच्या बाहेर आला होता तसेच घटनास्थळ पंचनामा करण्यापूर्वीच तेथील बॅनर काढलेले होते त्यामुळे पंचनामा केला त्यावेळी पोलवर कोणतेही बॅनर नव्हते, त्यामुळे त्याला बॅनर बद्दल काहीच सांगता आले नाही.

११. अभिलेखावर उपलब्ध सर्व पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ हा फिर्यादी असून त्याने त्याच्या पुराव्यात कथन केल्याप्रमाणे आदर्श आचारसंहिता सुरु असतांना अपक्ष उमेदवार निवास धरमचंद

चव्हाण यांच्या निवडणूकीचे बॅनर त्यांनी कैलासनगर, पळसखेड, ता.मंठा येथील इलेक्ट्रीक पोलवर पाहिले होते. परंतु त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान हे मान्य केले आहे की, ते बॅनर कोणी लावले याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. तसेच ते बॅनर कोणाच्या निष्काळजीपणामुळे लावले याबाबत देखील त्यांना काहीही सांगता आले नाही. तसेच सदरील बॅनर इलेक्ट्रीक पोलवर कोणी लावले याबाबत कथन करणा–या कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे सदरील बॅनर आरोपी क्र. २ यांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी क्र. १ यांनी लावला याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही. तसेच उपलब्ध पुराव्यांवरुन आरोपी क्र. २ यांचा गुन्हयात काय सहभाग होता याबाबत कोणताही बोध होत नाही. अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन आरोपी क्र. २ विरुध्द कोणताही गुन्हा किंवा गुन्हयातील सहभाग सिध्द होत नाही. याउलट फिर्यादीने आरोपी क्र. २ विरुध्द दिलेली तक्रार ही कोणत्याही तथ्याशिवाय व चुकीचा मजकुर नमुद करुन दाखल केल्याचे दिसून येते.

**१२.** अभियोग पक्षाच्या साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र. २ हा घटनास्थळ पंच असून त्यांची साक्ष घटनास्थळ पंचनाम्याच्या शाबीतीपर्यंत मर्यादीत आहे. जरी या साक्षीदाराने सरतपासात घटनास्थळ पंचनामा त्याच्या समक्ष झाल्याचे कथन केले असले तरी देखील उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले आहे की, घटनास्थळ पंचनामा झाला त्यावेळी त्या इलेक्ट्रीक पोलवर कोणतेही बॅनर नव्हते. तसेच ते बॅनर कोणी काढले किंवा कसे याबाबत त्याने कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने फिर्यादीत नमुद

केल्याप्रमाणे एम.एस.ई.बी. च्या इलेक्ट्रीक पोलवर खरोखरच बॅनर होते अथवा नाही याबाबत संशय निर्माण होते.

**१३.** अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन एकंदरीत असे दिसून येते की, तथाकथीत बॅनर इलेक्ट्रीक पोलवर लावतांना पाहिलेला एकही साक्षीदार अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आरोपी क्र. २ यांचा प्रत्यक्ष सहभाग सिध्द होऊ शकलेला नाही. आरोपींनी सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान केले याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपी क्र. २ यांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी क्र. १ याने त्याच्या निवडणुकीचे बॅनर लावून सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान केले याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. फिर्यादीने आरोपी क्र. १ व २ विरुध्द दाखल केलेली तक्रार ही तथ्यहिन असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपींनी गुन्हा केल्याची बाब सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ ला **नकारार्थी** उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आ दे श

१. आरोपी क्र. **१) निवास धरमचंद राठोड, व** आरोपी क्र. **२) रविंद्र रामचंद्र मोरे,** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८ (१) अन्वये सार्वजनिक

मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायद्याचे कलम ३ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील रकालावधीपर्यंत **प्रत्येकी रु.१५,०००/–** किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.02 15:07:09 +0530

**( श्रीमती एल. पी. धन्वे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

दिनांक ०२/०५/२०२६. मंठा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे – अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नाव – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मंठा
पिडीएफ दिनांक – ०२/०५/२०२६

**स्वाक्षांकीत/-**
लघुलेखक